पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - ४५३ दिनांक - २७/१०/२०२४

**डेक्कन पोलीस स्टेशन व गुन्हे शाखा युनिट १, पुणे शहर.**

# डेक्कन परिसरात दरोडयाच्या तयारीत असलेला आरोपी पोलीसांच्या ताब्यात डेक्कन पोलीस ठाणे व गुन्हे शाखेची संयुक्त कारवाई

दिनांक २२/१०/२०२४ रोजी डेक्कन पोलीस ठाणेकडील मार्शल डयुटीवर नेमणुकीस असलेले पोलीस अंमलदार महेश तांबे व गणेश सातव हे रात्र गस्त करीत असताना रात्री ०२/३० वा. चे सुमारास अभिनव विदयालय पथ, जानकी व्हीला बंगल्यासमोरील रोडवर, एरंडवणा, पुणे या ठिकाणी आले असता तेथे दोन संशयीत इसम त्यांना दिसुन आल्याने त्यांच्याकडे विचारपुस करता ते उलट सुलट उत्तरे देत होते व त्यांनी त्यांच्या साथीदारांना आवाज दिला त्यादरम्यान त्यांचे ४ साथीदार अंधारात धारदार शस्त्रासह एका बंगल्याच्या आवारात दरोडयाच्या तयारीत दबा धरुन बसलेले होते. सदर ४ जण बंगल्याच्या गेटवरुन उडया मारुन बाहेर येवुन लगेचच त्यांच्याकडे असणा-या धारदार शस्त्राद्वारे पोलीस अंमलदार महेश तांबे व गणेश सातव यांच्यावर हमला करण्यास सुरवात केली. त्यावेळी पोलीस अंमलदार महेश तांबे यांनी स्वसंरक्षणाकरीता त्यांच्यावर पायाच्या दिशेने फायरींग केली. त्यावेळी सदरचे चोरटे अंधाराचा फायदा घेवुन तेथुन पळुन गेले.

त्याअनुषंगाने डेक्कन पोलीस ठाणे येथे अनोळखी चोरटयां विरुध्द गु.र.नं. १७१/२०२४ भारतीय न्याय संहिता कलम ३१०(१),१२१(१),१३२ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५), मुंबई पोलीस अधिनियम ३७ (१)(३), १३५ अन्वये दिनांक २२/१०/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता.

दाखल गुन्हयाच्या मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली डेक्कन पोलीस ठाणे तपास पथक तपास करीत असताना सदरचे चंदनचोर हे संभाजीनगर येथील असल्याचे निष्पन्न झाल्याने मा.वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली डेक्कन पोलीस ठाणे तपास पथक व गुन्हे शाखा युनिट-१ पुणे शहर यांच्या पथकाने छत्रपती संभाजीनगर येथे रवाना होवुन छत्रपती संभाजीनगर येथे निषन्न झालेल्या पत्त्यावर जावुन तेथे

**आसिफ हरुनखाँ गोलवाल वय २४ वर्षे, रा. जंजाळ, पो. झेड.पी स्कुल जवळ अंभाई, ता. सिल्लोड, जि. संभाजीनगर** यास ताब्यात घेवुन त्याच्याकडे अधिक चौकशी करता सदरचा गुन्हा हा त्याने व त्याचे साथीदार **१) शाहरुख कादीरखाँ पठाण २) फारुकखाँ कादीरखाँ पठाण सर्व रा. मुर.पे. जंजाळ, ता. सिल्लोड, संभाजीनगर** यांनीच केल्याचे सांगुन त्यात फायरींगच्या वेळी फारुखखाँ कादीरखाँ पठाण व शाहरुखखाँ कादीरखाँ पठाण हे दोघे जखमी झाले असुन सध्या ते पळुन गेले आहेत असे सांगितले. आरोपी आसिफ हरूनखाँ गोलवाल याने हकीगत सांगितल्याने त्यास ताब्यात घेवुन डेक्कन पोलीस ठाणे येथे आणुन दाखल गुन्हयात अटक करण्यात आले आहे. व सदर आरोपी सध्या पोलीस कस्टडीत आहे. छत्रपती संभाजीनगर येथील सिल्लेड तालुक्यात तपास पथकाने बाकी आरोपीतांचा शोध घे्तला असता दोन आरोपीत शाहरुख कादीरखाँ पठाण २) फारुकखाँ कादीरखाँ पठाण हे त्यांच्या पायाला गोळी लागुन जखमी झाले बाबत खात्रीलायक माहिती मिळालेली आहे. सदर जखमी आरोपी व इतर १) नदीमखा लतिफखाँ २) फिरोजखाँ शरीफखाँ ३)नजीमखाँ सादुखाँ या आरोंपीतांचा शोध घेत आहोत.

सदरची कारवाई ही मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर श्री. अमितेश कुमार, मा. पोलीस सह आयुक्त,पुणे श्री. रंजनकुमार शर्मा, मा.अपर पालीस आयुक्त गुन्हे श्री. शैलेश बलकवडे, मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री. प्रविण पाटील, मा. पोलीस उप-आयुक्त श्री. संदिप सिंह गील्ल, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे पुणे श्री. निखील पिंगळे,मा.सहा.पोलीस आयुक्त विश्रामबाग विभाग, पुणे श्री. साईनाथ ठोंबरे, मा.सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे १ श्री. गणेश इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली डेक्कन पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्रीमती गिरीषा निंबाळकर व डेक्कन पोलीस ठाणेकडील पोलीस उप-निरीक्षक महेश भोसले, अजय भोसले. दत्तात्रय सावंत, गुन्हे शाखा युनिट १ चे पोलीस निरीक्षक श्री.शब्बीर पठाण, सहा.पो.निरीक्षक कवटीकर सपोफौ शिंदे,मखरे, पोलीस अंमलदार शुभम देसाई, दरेकर, सोनवणे, साबळे, सागर घाडगे, वसीम सिद्दीकी, दंडगुले, रोहित पाथरुट, नागराज म्हस्के,खारतोडे, सुनिता शेंडकर मपोहवा धनश्री सुपेकर तसचे परिमंडळ -१ मधील पोलीस ठाणेकडील पोलीस अंमलदार धडस, पाटील, अवचारे, स्वामी, या पथकाने केलेली आहे.